# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१८

## अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**प्रश्नांची एकूण संख्या - ५०**

**औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील ग्रामपंचायतीमध्ये झालेला गैरव्यवहार**

**(१) ५६३८ (०८-०४-२०१५). डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) औंढा नागनाथ (जि.हिंगोली) येथील औंढा ग्रामपंचायतीने तत्कालीन ग्रामविकास अधिकारी व शाखा अभियंता पंचायत समिती औंढा यांनी रोड व नाली बांधकाम, सौर उर्जेवर चालणारे पथदिवे, विद्युत पंप ही कामे अपूर्ण करुन सदरील कामाचा पूर्ण निधी घेवून अपहार केल्याची तक्रार संबंधित ग्रामस्थांनी स्थानिक लोकप्रतिनिधीकडे केल्याचे माहे जानेवारी, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त कामे ठक्करबाबा विकास निधीतून होतात परंतु या कामात गैरव्यवहार झाल्याचा आरोप असल्याने शासनाने याबाबत चौकशी करुन दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२०-०१-२०१८) :** (१) नाही.

(२) व (३) सिमेंट रस्ता व नाली बांधकाम ठक्करबाप्पा योजनेतून मोजमापानुसार पूर्ण केले असून पूर्णत्वाचे प्रमाणपत्र प्राप्त आहे. विद्युतीकरण व सौर विद्युत पंप ही मंजूर कामे मूल्यांकनाप्रमाणे झालेली आहेत. तक्रारीतील कोणतेही काम अर्धवट नाही.

---

**शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील खातीवली, वासिंद येथील शुभवास्तु या गृहसंकुलाच्या विकासकाने केलेले अतिक्रमण**

**(२) ८४३७ (०६-०७-२०१५). श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शहापूर (जि.ठाणे) तालुक्यातील खातीवली, वासिंद येथील शुभवास्तु या गृहसंकुलाच्या विकासकाने आदिवासी लोकांसाठी असलेली स्मशानभूमी, विहिर यावर अतिक्रमण केल्याची बाब नुकतीच निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, यासंदर्भात चौकशी करण्यात आली आहे काय,
(३) असल्यास, त्यात काय आढळून आले व तदनुसार संबंधित विकासकांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) प्रश्न उद्भवत नाही.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राधानगरी (जि.कोल्हापूर) धरण व परिसर सुशोभिकरणासाठी निधी देण्याबाबत**

**(३) २६४८७ (११-०८-२०१५). श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी), श्री.उल्हास पाटील (शिरोळ) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) धरण व परिसर सुशोभिकरणासाठी तात्काळ निधी उपलब्ध करुन देण्यात यावा अशी मागणी लोकप्रतिनिधीनी संबंधीत अधिकाऱ्यांकडे केली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर परिसर तात्काळ सुशोभिकरण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०२-२०१८) :** (१) नाही.
तथापि, राधानगरी येथील धरणस्थळावर पर्यटन विकास व प्रकल्पाच्या माहितीस्तव "राजर्षी शाहू महाराजांच्या कार्याचे माहिती केंद्र" उभारणीसाठी जागा उपलब्ध करण्यासाठी लोकप्रतिनीधींकडून मागणी करण्यात आली आहे.
(२) राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्यासंबंधीत माहिती केंद्र उभारणीसाठी राधानगरी धरणाच्या निम्न बाजूस ८४० चौ.मी. जागा जिल्हा परिषद, कोल्हापूर यांच्याकडे भाडेतत्वावर हस्तांतरीत करण्यात आली असून सदर जागेत अपेक्षित कामे जिल्हापरिषदेकडून प्रगतीपथावर आहेत.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पालघर जिल्हयातील सिंचन विहीरीची योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(४) ४११९८ (०४-०५-२०१६). श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.हितेंद्र ठाकूर (वसई) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील मोखाडा,विक्रमगड, जव्हार, तलासरी व वाडा या तालुक्यात शासनाने सिंचन विहीरीसाठी ४.३० कोटीचा निधी उपलब्ध करुन देऊनही सिंचन विहीरीची योजना प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती काय आढळून आले व त्यानुसार सिंचन विहीरीची योजना यशस्वीपणे राबविण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१६-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

पालघर जिल्ह्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत आर्थिक वर्ष २०११-१२ ते माहे जुलै २०१७ पर्यंत मंजूर विहीरी २१९१ असून त्यापैकी सुरु केलेल्या विहीरी १६१८ आहेत. ९३५ विहिरींची कामे पूर्ण झालेली असून ६८३ विहीरींची कामे प्रगतीपथावर आहेत. मंजूर पैकी काम सुरु न झालेल्या विहीरी ५७३ आहेत.

पूर्ण झालेल्या ९३५ विहींरीवर प्रत्यक्ष कुशल खर्च रु.६२६.८८ लक्ष व अकुशल खर्च ५१५.१६ लक्ष झालेला आहे. प्रगती पथावरील ६८३ विहीरींवर माहे जुलै २०१७ अखेर कुशल खर्च रु.२५१.४६ लक्ष व अकुशल खर्च रु.४१७.२३ लक्ष झालेला आहे.
(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या मालकी असलेल्या अनेक जागांवर खासगी संस्था व प्रतिष्ठानांनी अतिक्रमण केल्याबाबत**

**(५) ४५५२० (२१-०४-२०१६). श्री.हरिष पिंपळे (मुर्तिजापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या मालकी असलेल्या अनेक जागांवर खासगी संस्था व प्रतिष्ठानांनी ताबा घेवून उक्त जागा वर्षानुवर्ष वापरुनही जागेचे भाडे थकित केलेले असल्यामुळे त्या भाड्याची वसुली केल्यास कोट्यवधी रुपयांचा महसूल मिळू शकेल मात्र अद्याप संबंधितांनी सदर भाडे वसुल केलेले नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासकीय जागेचा ताबा घेतलेल्या संस्थांवर व प्रतिष्ठिनानांवर तसेच सदर प्रकरणाकडे दुर्लक्षित करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०१-२०१८) :**(१) हे खरे नाही. तथापि.

* जिल्हा परिषद अकोला यांच्या मालकीची एकूण २० गाळे असून सर्व गाळे ५ वर्षाच्या कराराने भाडे तत्वावर वितरित करण्यात आले आहे. त्यांच्याकडून भाडे वसूली नियमित करण्यात येत आहे. मात्र ५ वर्षापेक्षा जास्त कालावधी होऊनही नवीन करार करण्यास ९ भाडेकरुनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच ८ भाडेकरुनी अकोला दिवाणी न्यायालयात दावा दाखल केलेला आहे. १ भाडेकरुसोबत करार करण्याची कार्यवाही सुरु आहे. उर्वरित २ भाडेकरुनी नियमित करार केलेला असून त्याप्रमाणे भाडे वसुली करण्यात येत आहे.

* अकोला जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या मालकीच्या जमिनीवर एकूण ५६ नागरीक/खाजगी संस्था/प्रतिष्ठान यांनी अतिक्रमण केले असून सदर अतिक्रमण कायदेशीर मार्गाने हटविण्याची कार्यवाही सुरु आहे.

(२), (३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील नदीतील जलस्त्रोत प्रदुषित करणाऱ्या उद्योगांसह महापालिकांना दंड आकारण्याचा घेतलेला निर्णय

**(६) ५३९२५ (२९-०८-२०१६). श्री.अजित पवार (बारामती), श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.विजय भांबळे (जिंतूर), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.दत्तात्रय भरणे (इंदापूर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्याच्या जलसंपदा विभागाने जलस्त्रोत प्रदूषित करणाऱ्या उद्योगांसह तसेच महापालिकांनी नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहात सांडपाणी सोडण्यापूर्वी त्यावर पूर्ण प्रक्रिया केली नाही तर त्यांना दुप्पट दंड आकारणी करण्याचा निर्णय माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान घेतला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ज्या उद्योगांनी तसेच महापालिकेने दिनांक ३० जून, २०१६ रोजी अखेर नैसर्गिक पाण्याच्या प्रवाहात सांडपाणी सोडण्यापूर्वी पूर्ण प्रक्रिया केली नाही अशा किती जणांवर कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०१-०२-२०१८) :** (१) होय.

(२) जलसंपदा विभाग शासन निर्णय क्र. पापव-२०१५ (प्र.क्र.८८/२०१५) सिं व्य महसूल दि.२१.४.२०१६ अन्वये जलस्त्रोत प्रदुषित करणाऱ्या पाणी वापरकर्त्याकडून दंडनीय पाणीपट्टी आकरणी करण्याबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात आलेली आहेत.

सदर शासन निर्णयानुसार जलसंपदा विभागाकडील क्षेत्रीय कार्यकारी अभियंत्यांनी महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळास उपलब्ध करुन दिलेल्या औद्योगिक व वाणिज्यिक पाणी वापर कर्त्यांच्या यादीपैकी ज्या पाणीवापरकर्त्यांच्या बाबतीत महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाने क्षेत्रीय कार्यकारी अभियंता यांना कळविले आहे. त्याअनुषंगाने पुणे महसूल विभागातील २ बिगर सिचन पाणीवापरकर्त्यांवर व औरंगाबाद महसूल विभागात परभणी महानगरपालिकेवर दंडात्मक कार्यवाही करण्यात आलेली आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**हिवरा आश्रम (जि.बुलढाणा) येथील विवेकानंद आश्रमाने स्वखर्चाने तयार केलेल्या भूमिगत नाल्याचे बांधकाम करण्याबाबत**

**(७) ५४७०७ (२४-०८-२०१६). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिवरा आश्रम (जि.बुलढाणा) येथील वार्ड क्र.३ मध्ये भीमनगरला लागूनच गावातील सांडपाणी जाण्यासाठी विवेकानंद आश्रमाने स्वखर्चाने तयार केलेली भूमिगत नाली ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम करतांना बंद करण्यात आल्याने पावसाळा सुरु होण्यापूर्वी सदर नाल्याचे बांधकाम करण्याबाबत स्थानिक ग्रामपंचायत प्रशासनाने सार्वजनिक बांधकाम विभागासह सात विभागाकडे माहे मे, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निवेदनाद्वारे मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर निवेदनानुसार भूमिगत नाल्याचे बांधकाम करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२) मौजे हिवरा (आश्रम) ता.मेहकर येथे ग्रामीण रुग्णालयाचे बांधकाम सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा मार्फत करण्यात येत असतांना स्थानिक विवेकानंद आश्रमाने सांडपाणी वाहून जाण्यासाठी स्वखर्चाने बांधलेली भूमिगत नाली अडल्यामुळे त्यामधील घाण पाणी इतरत्र पसरल्याने तेथील रहिवाशांना त्रास सहन करावा लागत आहे. सदर सांडपाण्याची व्यवस्था करण्यासाठी ग्रामपंचायतीने सार्वजनिक बांधकाम विभाग, बुलडाणा यांचेकडे मागणी केलेली आहे. याबाबत स्थळ पहाणी केली असता, विवेकानंद आश्रमाने स्वखर्चाने बांधलेल्या भुमिगत नालीमधून येणारे सांडपाणी दवाखान्याच्या जागेमधून वाहन जाऊन पुढे वस्तीमध्ये इतरत्र पसरत आहे. सदर सांडपाणी वाहून जाण्यासाठी दुस-या उघडया नालीमधून मार्ग करुन देण्यात आला आहे. याबाबत स्थानिक विवेकानंद आश्रमाद्वारे मुलांचे वसतिगृह चालविण्यात येत असल्याने सदर वसतीगृहातील सांडपाण्याची व्यवस्था विवेकानंद आश्रम, करण्यास तयार असल्याबाबत सचिव, विवेकानंद आश्रम, विवेकानंद नगर, ता.मेहकर यांनी त्यांच्या दिनांक १८/०७/२०१७ च्या पत्रान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, बुलढाणा यांना कळविले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**सिंधुदुर्ग जिल्हयात आमदार आदर्श गाव योजना प्रलंबित असल्याबाबत**

**(८) ५४९२८ (२०-०८-२०१६). श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आदर्श ग्राम योजना केंद्र सरकारने सुरू केली त्याच धर्तीवर राज्यात आमदार आदर्श ग्राम योजनेची घोषणा सन २०१५-२०१६ मध्ये केली होती परंतु एक वर्षाचा कालावधी उलटूनही सिंधुदुर्ग जिल्ह्यात गावांचा विकास आराखडाच तयार करण्यात आला नसल्याचे माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार आमदार आदर्श गाव योजनांची अंमलबजावणी होण्याच्या दृष्टीने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०१-०१-२०१८) :** (१) खरे नाही.

माहे मे, २०१७ अखेर आमदार आदर्श ग्राम योजनेंतर्गत सिंधुदूर्ग जिल्ह्यातील निवडण्यात आलेले एकूण सात गावांपैकी तळगाव चौकुळ, कळमसुली व नापणे या चार गावांचे ग्रामविकास आराखडे ग्रामपंचायतस्तरावर तयार करण्यात आले आहेत.

यापैकी तळगाव गावाच्या आराखड्यास आमदार महोद्यांची अंतिम मान्यता प्राप्त झालेली आहे. उर्वरित तीन गावांपैकी मसुरे व किंजवडे या दोन गावांची निवड माहे एप्रिल व मे, २०१७ ला निवड करण्यात आली आहे.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पुणे जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये गैरप्रकार होत असल्याबाबत**

**(९) ५५६०९ (११-०८-२०१६). श्री.संग्राम थोपटे (भोर), श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्ह्यातील अनेक ग्रामपंचायतींमध्ये आर्थिक गैरव्यवहार, दप्तर सुस्थितीत न ठेवणे, गहाळ करणे आदी प्रकार स्थानिक निधी लेखापरीक्षणात उघड झाल्यानंतर देखील ग्रामपंचायतींवर कोणतीच कारवाई होत नसल्याचे माहे एप्रिल, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यानुसार गैरव्यवहार करणाऱ्या संबधित अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) i) पुणे जिल्हयात एकूण १४०७ ग्रामपंचायती असून स्थानिक निधी लेखापरीक्षक पुणे यांच्याकडून २०१५-१६ मध्ये ग्रामनिधी अपहाराची साल (ता. आंबेगांव), लाटे (ता. बारामती), यवत (ता. दौंड) या ग्रामपंचायतींची प्रकरणे प्राप्त झाली असून साल ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक यांना निलंबित करून फौजदारी गुन्हा दाखल केला आहे. लाटे ग्रामपंचायतींच्या ग्रामसेवकावर प्रशासकीय कारवाई सुरु आहे. यवत ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकावर गुन्हा दाखल केला असून त्यांच्यावर सद्या कोर्ट केस सुरू आहे.

ii) सन २०१६-१७ मध्ये स्थानिक निधी लेखापरीक्षक पुणे यांच्याकडून संशयित ग्रामनिधी अपहाराची एकूण १४ नवी प्रकरणे प्राप्त झाली असून संबंधित गटविकास अधिकारी यांना कारवाई करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पुणे यांनी पत्र दिले असून पंचायत समिती स्तरावरून कार्यवाही सुरू आहे.

iii) सन २०१६-२०१७ मध्ये स्थानिक निधी लेखापरीक्षक पुणे यांच्याकडून दप्तर उपलब्ध न झालेली एकूण १९ प्रकरणे प्राप्त झालेली असून त्याबाबत केलेल्या चौकशीनुसार९ ग्रामपंचायतींचे अभिलेखे उपलब्ध आहेत. त्यापैकी ३ ग्रामपंचायतींच्या अभिलेख्यांचे लेखापरीक्षण पूर्ण झालेले आहे. ४ ग्रामपंचायतींचे लेखापरीक्षण करण्याबाबत स्थानिक निधी लेखा, पुणे यांना कळविणेत आले आहे. एका ग्रामपंचायतींचे दप्तर पोलिस स्टेशन मध्ये जमा केलेले आहे व एका ग्रामपंचायतींचे दप्तर न्यायालयात मध्ये जमा केलेले आहे.

उर्वरित १० ग्रामपंचायतींपैकी ६ ग्रामपंचायतींकडे दप्तर उपलब्ध नाही. यापैकी ४ ग्रामपंचायतीच्या ग्रामसेवकांवर खातेनिहाय चौकशी प्रस्तावित केली आहे. एका ग्रामपंचायतीचे संबंधित ग्रामसेवक मृत्यू पावले आहेत. एका ग्रामसेवकाना निलंबित केले आहे तसेच ४ ग्रामपंचायतींचे दप्तर महानगरपालिका/नगरपालिकांकडे जमा केलेले आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**पट्टणकोडोलीचा तांबडा (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) तलावाचे संवर्धन करण्याबाबत**

**(१०) ५८३७० (१०-०८-२०१६). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पट्टणकोडोलीचा तांबडा तलाव (ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर) संरक्षक कठडयाची पडझड, खुरटया झुडपांचे अतिक्रमण, तलावाच्या सभोवती अस्वच्छता करणे तसेच ग्रामस्थांनी तलावाभोवती केलेले अतिक्रमण यामुळे सदर तलाव नामशेष होण्याच्या मार्गावर आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, त्यानुषंगाने सदर तलावाचे संवर्धन करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) मौजे पट्टणकोडोली येथील तांबडा तलाव सन १९७२ मध्ये दुष्काळी कामातून ग्रामपंचायतीच्या गायरान भागात झालेला आहे. सदर तलाव ग्रामपंचायत पट्टणकोडोली यांचे वहिवाटीस आहे. तांबडया तलावाच्या पूर्व बाजूस पूर्ण व पश्चिम बाजूकडील थोडा भाग दगडी कठडा असून, उर्वरित तलावाच्या कठडा दगड व मातीचा असून, त्याची अंश:त पडझड झाली आहे. तसेच सदर दगड व मातीच्या कठडयावर काही अंशी खुरटी झुडपे आहेत. सदर तलावाच्या सभोवती सद्या कोणीही शौचास बसत नाही. ग्रामस्थांनी तलावाभोवती अतिक्रमण केल्याचे दिसून येते. तथापि सदरचे अतिक्रमण मोजणी झाल्याशिवाय निश्चित होत नसल्याने मोजणी करण्याकरिता ग्रामपंचायतीकडून संबंधित खात्याकडे मागणी करणेत आलेली आहे.

(३) सदर तलावाचे संवर्धन करण्याकरिता तसेच तलावाचे सौंदर्य वाढवण्याकरिता तलावातील गाळ काढणे, दुरुस्ती करणे, सुशोभिकरण व संरक्षण भिंतीकरिता ग्रामपंचायतीने दि. ३०/०६/२०१७ रोजी प्रस्ताव जिल्हा परिषद, कोल्हापूरकडे पाठविला आहे. सदर तलावाची मोजणी करून घेऊन वरीलप्रमाणे कामे करण्याकरिता निधी मिळण्याकरिता सरोवर संवर्धन कार्यक्रमांतर्गत प्रस्ताव पर्यावरण विभागाकडे सादर करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयाच्या ३१६ रोहयोच्या कामापैकी काही कामे पावसाळ्यात सुरु ठेवल्याबाबत**

**(११) ६०२४९ (२३-०८-२०१६). श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयात सध्या ३१६ रोहयोची कामे सुरु असून यंदाच्या पावसाळ्यात त्यातील काही कामे सुरु ठेवण्याचा निर्णय माहे मे, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पावसाळ्यात कोणकोणती कामे रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात येणार असून यामुळे किती मजूरांना रोजगार उपलब्ध होणार आहे,

(३) तसेच ठाणे जिल्ह्यात ३१६ रोहयोच्या कामापैकी काही कामे पावसाळ्यात सुरु ठेवण्याच्या घेतलेल्या निर्णयाची अमंलबजावणी करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१५-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) रोहयो अंतर्गत कोणतीही कामे करण्यात आली नसून मनरेगा अंतर्गत साधारणपणे २४६३ कामे यंत्रणेमार्फत सुरु करण्यात आली आहेत.

(३) अशी बाब नाही.

(४) अशी बाब नाही.

---

**वाकळघर (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) येथील बोअरवेलची दुरुस्ती करण्याबाबत**

**(१२) ६३०४७ (१०-०८-२०१६). श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), डॉ.सतीश (अण्णासाहेब) पाटील (एरंडोल), श्री.शामराव ऊर्फ बाळासाहेब पाटील (कराड उत्तर), श्री.सुरेश (राजूमामा) भोळे (जळगाव शहर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वाकळघर (ता.श्रीवर्धन, जि.रायगड) ग्रामपंचायत हद्दीतील रहिवाशांच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्यासाठी स्थानिक विकास कार्यक्रम निधीतून बसविलेली बोअरवेल नादुरुस्त असल्याचे माहे जून, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरील बोअरवेल दुरुस्तीसाठी तेथील नागरीकांनी गटविकास अधिकारी, पंचायत समिती, श्रीवर्धन तसेच ग्रामपंचायत कार्यालयाकडे दिनांक ९ जून, २०१६ तसेच वारंवार तक्रारी केलेल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) तसेच सदर बोअरवेलची देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत वाकळघर ग्रामपंचायतीने ठराव केला असतानाही अद्याप बोअरवेल दुरुस्तीबाबत कोणतीही कार्यवाही ग्रामपंचायतीने केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(५) असल्यास, चौकशीनुसार परिसरातील नागरीकांच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी बंद अवस्थेत असलेली बोअरवेलची दुरुस्ती करण्यासह बोअरवेल दुरुस्ती करण्यास दिरंगाई करणाऱ्या अधिकाऱ्यावर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) हे खरे नाही.

ग्रामपंचायतीने बोअरवेल देखभाल व दुरुस्ती करण्याबाबत ठराव केलेला नाही.

(४) सदरच्या बोअरवेलची पाहणी केली असता बोअरवेलमध्ये विद्युत पंप (मोटर) अडकल्यामुळे बोअरवेल नादुरुस्त झाली असल्याचे निदर्शनास आले. सदरचा पंप बोअरवेलमधून निघत नसल्याने बोअरवेल दुरुस्त होऊ शकणार नाही.

(५) ग्रामपंचायत परिसरातील नागरीकांच्या पिण्याच्या पाण्याची समस्या गावातील पथदर्शी प्रकल्पा अंतर्गत कार्यान्वीत केलेल्या नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे व इतर बोअरवेल / साध्या विहिरीद्वारे केलेली आहे. एक बोअरवेल नादुरुस्त असली तरीही पाण्याची कोणतीही समस्या नाही.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

___________

**मौजे जानुगडेवाडी, शितपवाडी, मंद्रूळकोळे व मंद्रूळकोळे खुर्द या गावांना कोल्हापूर पध्दतीच्या माध्यमातून धरणातील पाणी देण्याबाबत**

**(१३) ६६२७३ (२७-०१-२०१७). श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील मौजे जानुगडेवाडी, शितपवाडी, मंद्रूळकोळे व मंद्रूळकोळे खुर्द ही गावे वांग मराठवाडी धरण लाभ क्षेत्रात येत आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वांग मराठवाडी धरण व या चार गांवाच्या मध्ये मोठा डोंगर असल्याने या धरणातील पाणी साठ्याचा या चार गावांना कोणताही लाभ मिळत नसून लिफ्ट इरिगेशनचे माध्यमातून सुध्दा या गावांच्या शेतीचे क्षेत्राला पाणी मिळणे अशक्य आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या चार गावातील केवळ १५ शेतक-यांच्या जमिन क्षेत्रात चार एकराचा स्लॅब लावला असून सदर जमिनीचे क्षेत्र हे पुनर्वसनासाठी संपादित करण्यात आले आहे तसेच या धरणातील पाण्याचा कसला ही लाभ होत नसताना या गावातील जमिनी पुनर्वसनासाठी संपादीत करण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, या चार गावांच्या वरच्या बाजूस महिंद धरण प्रकल्प कार्यन्वीत असून मंद्रूळकोळे खुर्द हद्दीपर्यंत वांग नदीतून धरणातील पाणी साठ्याचा लाभ होणार असल्याने सदर चार गावातील शेतक-यांनी ही चार गावे वांग मराठवाडी धरण लाभ क्षेत्रातून वगळून महिंद धरण लाभ क्षेत्रात समाविष्ट करण्याबाबत मागणी केली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, या संदर्भात मा.जलसंपदा मंत्री यांचेकडे दिनांक १५ जुलै, २०१६ रोजी वा त्यासुमारास लेखी पत्राद्वारे मागणी केली असून या संदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०१-२०१८) :** (१) होय

(२) अंशत: खरे आहे.

(३) अंशत: खरे आहे.

(४) होय.

(५) वांग नदीवर एकूण १० को.प.बंधारे प्रस्तावित असून पैकी ६ पूर्ण झालेले आहेत उर्वरीत ४ को.प.बंधारे निधीच्या उपलब्धतेनुसार हाती घेण्यात येत आहेत. मौजे जानुगडेवाडी, शितपवाडी, मंद्रुळकोळे व मंद्रूळकोळे खुर्द ही गावे वांग मराठवाडी धरण लाभक्षेत्राच्या अधिसूचनेत आहेत.

(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

**ठाणे जिल्हयात कोलशेत येथील खाडी किनार पट्टीवर जेट्टीसह परिसराचे सुशोभिकरण करण्याबाबत**

**(१४) ६८५१३ (२७-०१-२०१७). श्री.संजय केळकर (ठाणे), श्री.किसन कथोरे (मुरबाड) :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्हयात कोलशेत येथील खाडी किनार पट्टीच्या पर्यटनास चालना देण्यासाठी जेट्टीसह परिसराचे सुशोभिकरण करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी लेखी स्वरुपात दिनांक ७ जून, २०१४ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास,सदर जेट्टी उभारल्याने पर्यटनाला चालना मिळून शेकडो तरुणांना रोजगार मिळण्याची संधी प्राप्त होईल, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१८-१२-२०१७) :** (१) मा.लोकप्रतिनिधींचे दि.७/६/२०१६ रोजीचे पत्र शासनास प्राप्त झाले आहे.

(२), (३) व (४) सदर पत्राच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी,ठाणे यांनी दि.७/११/२०१६ च्या पत्रान्वये कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड, मुंबई यांना सदर कामाबाबत कार्यवाही करण्याबाबत कळविले होते. मात्र, त्यापूर्वीच अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र मेरीटाईम बोर्ड,मुंबई यांनी दि.२/९/२०१६ च्या पत्रान्वये सदरचे काम जिल्हा वार्षिक योजनेच्या सन २०१७-२०१८ च्या आराखड्यात समाविष्ट करण्याचे प्रस्तावित केले आहे.

---

**राज्यातील संरपचांना किमान तीन महिन्यांनी एकदा पंचायत समिती स्थरावर प्रशिक्षण देण्याबाबत**

**(१५) ६९२८१ (२७-०१-२०१७). श्री.डी.एस.अहिरे (साक्री), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सुमारे २८ हजार ग्रामपंचायत आहेत यापैकी अनेक ग्रामपंचायतीचे संरपच अशिक्षित असतात परंतु त्याना प्रशिक्षण दिले जात नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील आदिवासी उपयोजना क्षेत्रातील बहुसंख्य संरपचांना ग्रामपंचायत कार्यप्रणाली माहित नसते याशिवाय राज्य व केंद्र शासनाच्या अनेक योजनांची, शासननिर्णय परिपत्रक, ग्रामपंचायच्या कामकाजाची नियमावली याची माहिती नसते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यासंदर्भात शासनाने निर्णय घेवून या संरपचांना किमान तीन महिन्यांनी एकदा पंचायत समिती स्थरावर प्रशिक्षण देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) अंशतः खरे आहे.

आदिवासी उपयोजना क्षेत्रातील पहिल्या वेळी निवडून आलेल्या अनेक सरपंचांना ग्रामपंचायत कार्यप्रणाली माहित नसते. याशिवाय राज्य व केंद्र शासनाच्या अनेक योजनांची, शासननिर्णय परिपत्रक, ग्रामपंचायतच्या कामकाजाची नियमावली यांची माहिती नसते.

तथापी, त्यानंतर विविध स्तरावरील आणि विविध योजनांतील होणारी प्रशिक्षण, सभा व आढावा बैठका यामधून त्यांना नियमित माहिती मिळते.

या विभागाच्या खालील केंद्र पुरस्कृत योजनांतर्गत सरपंच आणि सदस्य यांना प्रशिक्षण देण्याचे कार्यक्रम राबविण्यात येतात. यामध्ये आदिवासी उपाययोजना क्षेत्रातील सरपंच व सदस्य यांचाही समावेश असतो.

१. राष्ट्रीय ग्राम स्वराज्य योजना (RGSY) अंतर्गत सन २०१०-११ ते माहे जुलै २०१४-१५ पर्यंत एकूण १,०९,२२८ इतकी प्रशिक्षण घेण्यात आली आहेत. सदर योजना सन २०१४-१५ मध्ये बंद करुन, राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान या योजनेमध्ये समाविष्ट करण्यात आली होती.

२. मागास क्षेत्र अनुदान निधी या केंद्र पुरस्कृत योजने अंतर्गत ८,४५१ ग्रामपंचायत सदस्य यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. केंद्र शासनाने सदर योजना सन २०१५-१६ पासून बंद केली आहे.

३. राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियान सन २०१४-१५ पासून कार्यान्वित करण्यात आले. सदर योजनेंतर्गत २७,६८६ ग्रामपंचायत सदस्य यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे.

४. राजीव गांधी पंचायत सशक्तीकरण अभियानांमध्ये क्रांतीज्योती प्रशिक्षणांतर्गत २४,१४० महिला ग्रामपंचायत सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

५. ग्राम पंचायत विकास आराखड्यांतर्गत (GPDP) सन २०१६-१७ मध्ये ग्रामपंचायतीच्या सरपंच व सदस्यांना लोकसहभागी विकेंद्रीत नियोजनाचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षणात अंदाजे २,५८,९७७ सदस्य सहभागी झाले होते.

६. राष्ट्रीय ग्राम स्वराज अभियानामध्ये सन २०१६-१७ पासून क्रांतीज्योती प्रशिक्षणा अंतर्गत ४,५५२ महिला ग्राम पंचायत सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. मिश्र ग्रामपंचायत सदस्य प्रशिक्षणांतर्गत ९,५४८ सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आले असून, पेसा क्षेत्रा अंतर्गत ११८ सदस्यांना प्रशिक्षण देण्यात आलेले आहे.

(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## पालघर जिल्हयातील टेण ग्रुपग्रामपंचायतीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१६) ७०८७२ (२७-०१-२०१७). श्री.पास्कल धनारे (डहाणू) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पालघर जिल्हयातील टेण ग्रुपग्रामपंचायतीमध्ये सन २०१३ ते २०१५ या सालात निधीच्या रक्कमेमध्ये ४ लाख ६४ हजार रूपयांचा गैरव्यवहार झाल्याची बाब माहे सप्टेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (१०-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

(२) सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे.

टेण ग्रुपग्रामपंचायतीमध्ये सन २०१३-१४ मध्ये अखेरची शिल्लक रुपये १२,६८,७५३/- इतकी होती. सदर रक्कम सन २०१४-१५ मध्ये आरंभिची रक्कम म्हणून नमूद करणे आवश्यक असताना रूपये ९,१४,७५३/- दर्शविण्यात आली आहे. त्यामुळे रूपये ३,५४,०००/- इतकी तफावत दिसून आली आहे. तसेच सन २०१४-१५ मध्ये रूपये १६,९६,६३८/- इतकी एकूण खर्चाची रक्कम नमूद करणे आवश्यक असताना रूपये १८,०७,४३८ इतकी रक्कम दर्शविण्यात आल्याने रूपये १,१०,८००/- ची तफावत दिसून येते.

त्यामुळे सन २०१४-१५ आरंभीच्या शिलकेत रू.३,५४,०००/- ची व सन २०१४-१५ च्या खर्चाच्या तपशीलात रू.१,१०,८००/- ची अशी एकूण रू.४,६४,८००/- ची तफावत असल्याचे नमुना क्र.३ व ४ वरून दिसून आले आहे. यामध्ये कोणताही गैरव्यवहार आढळून आलेला नाही.

(३) व (४) महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे कलम ४ (२) अनुसार गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पालघर यांच्या दि.२४.७.२०१७ च्या आदेशान्वये उपरोक्त नमूद तफावतीबद्दल प्रशासकीय कामात हलगर्जीपणा केल्यामुळे त्यास जबाबदार असलेल्या तत्कालीन ग्रामविकास अधिकारी श्रीमती भारती दिपक कांबळे यांची पुढील वेतनवाढ तात्पुरत्या स्वरूपात एक वर्षासाठी रोखण्यात आली आहे.

---

**प्रत्येक जिल्हयात 'जिल्हा पंचायत संसाधन केंद्र' स्थापन करण्याच्या आदेशाबाबत**

**(१७) ७५३९० (१५-०४-२०१७). श्री.संजय सावकारे (भुसावळ), श्री.उदेसिंग पाडवी (शहादा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पंचायतराज व्यवस्था अधिक बळकट करण्यासाठी प्रत्येक जिल्हयात 'जिल्हा पंचायत संसाधन केंद्र' स्थापन करण्याचे आदेश माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान केंद्र सरकारने राज्यांना दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा पंचायत संसाधन केंद्र स्थापन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) होय, हे अशंत: खरे आहे.

(२) राज्य शासनाने दि. ०३ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयाअन्वये २५ जिल्हयांसाठी जिल्हा पंचायत संसाधन केंद्र स्थापन करण्यास मान्यता दिलेली आहे. त्याअनुषंगाने दि. १५ जून, २०१५ च्या शासन निर्णयान्वये सध्या कार्यरत असलेल्या ६ शासकीय ग्रामसेवक प्रशिक्षण केंद्रांचे रुपांतर जिल्हा पंचायत संसाधन केंद्रामध्ये केलेले आहे. तसेच, दि.६ जानेवारी,२०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा पंचायत संसाधन केंद्र स्थापन करण्यासाठी तज्ञ गट समितीची स्थापना केली आहे. समीतीने दि.११ जुलै,२०१७ रोजी त्यांचा अंतरिम अहवाल शासनास सादर केलेला आहे. व सदर समितीला दि.३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**विक्रमगड (ता.जि.पालघर) येथील खडेद ग्रामपंचायतीत रोजगार हमीच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१८) ७५५२९ (१५-०४-२०१७). श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.कालीदास कोळंबकर (वडाळा), श्री.भारत भालके (पंढरपूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विक्रमगड (ता.जि.पालघर) येथील खडेद ग्रामपंचायतीत रोजगार हमीच्या मस्टरवर मृत लोकांची नांवे घालून पैश्याचा अपहार केला जातो तसेच काम न करता कागदोपत्री रस्ते दाखवून त्याचे पैसे संबंधित दोन ग्रामसेवकांनी घेतले असल्याचे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास,चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१५-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

रोजगार हमी योजनेच्या मस्टरवर मृत मजूरांची नावे असण्याची बाब प्राथमिक चौकशीत निदर्शनास आली आहे.

ग्रामपंचायत खडेद क्षेत्रात रोजगार हमी योजनेतून सन २०१४ ते २०१६ या कालावधीत अनेक रस्त्यांची कामे प्रत्यक्षात झालेली आहेत. त्यामुळे, काम न करता कागदोपत्री रस्ते दाखविल्याची बाब खरी नाही.

(२) विस्तार अधिकारी, पंचायत समिती विक्रमगड यांचेकडून प्राथमिक चौकशी करण्यात आलेली असून रोजगार हमी योजनेच्या मस्टरवर मृत मजूरांची नावे असणे, मजुरांना त्यांची मजूरी न मिळणे इत्यादी बाबी निदर्शनास आल्या आहेत.

(३) चौकशीत दोषी आढळून आलेल्या दोन ग्रामसेवकांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, पालघर यांच्या दि. ०९.१२.२०१६ च्या आदेशान्वये निलंबित करण्यात आले आहे. एका ग्रामरोजगार सेवकास सेवेतून काढून टाकण्यात आले आहे. तसेच त्या तिघांवर विक्रमगड पोलीस स्टेशनमध्ये दि. ०६.०२.२०१७ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मेहकर ते नेमतापूर (जि.बुलढाणा) रस्त्यांवरील पुलाची दुरस्ती करण्याबाबत**

**(१९) ७६१७३ (१२-०४-२०१७). डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेहकर ते नेमतापूर (जि.बुलढाणा) रस्त्यांवर असलेल्या पूलाला मोठ्या प्रमाणात खड्डा पडला असून या पूलाच्या दुरुस्तीबाबत स्थानिक नागरिकांनी वारंवार तक्रार करुनही कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर पूलाची तातडीने दुरुस्ती करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) असल्यास, याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०१-२०१८) :** (१) स्थानिक नागरिकांनी तक्रार केल्याचे जिल्हा परिषदेकडे आढळून आले नाही. परंतू मोरीचे पाईप विस्थापित झाले आहेत हे खरे आहे.
(२) व (३) प्रश्नांकित ग्रामीण मार्ग क्र. १२५ वर सा.क्र. ०/४०० मधील मोरीच्या दुरुस्तीचे काम सन २०१७-१८ मध्ये जिल्हा परिषदेला विविध योजनांमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून प्राथम्यक्रमानुसार प्रस्तावित करण्याचा जिल्हा परिषदेचा प्रयत्न आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### हदगांव (जि.नांदेड) येथील एकूण १२५ ग्रामपंचायतीमध्ये बायोमेट्रीक मशीन बसविण्याबाबत

**(२०) ७६४४२ (१५-०४-२०१७). श्रीमती अमिता चव्हाण (भोकर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) हदगांव (जि. नांदेड) येथील एकूण १२५ ग्रामपंचायतीमध्ये बायोमेट्रीक मशीन बसविण्यात येणार होत्या त्यासाठी ग्रामपंचायतीचा ठराव मशीनची किंमतही देण्यात आली असून पंचायत समिती विभागाने मशीनही खरेदी करुन ठेवल्या असुनही नांदेड जिल्हयाला पोर्टल उपलब्ध न झाल्याने या बायोमेट्रीक मशीन वापराविना पडून असल्याचे दिनांक ५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गाव विकासासाठी तलाठी, ग्रामसेवक, अभियंता, डॉक्टर, आरोग्य सेवक यांच्यासाठी बायोमेट्रीक प्रणाली नांदेड जिल्हयात कार्यान्वित नसल्याने या पैकी काही मंडळी आपली उपस्थिती दाखून महिन्याचे वेतन घेतात परंतु कामे मात्र वर्षानवर्षे प्रलंबित ठेवतात, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नांदेड जिल्ह्यातील ग्रामपंचायतीमध्ये बायोमेट्रीक मशीन उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही. नांदेड जिल्ह्यात पोर्टल उपलब्ध न झाल्याने या बायोमेट्रीक मशीन वापराविना पडून होत्या हे निदर्शनास आल्यानंतर गट विकास अधिकारी पंचायत समिती हदगांव यांनी सदर मशिन्स सुरू करून देण्याबाबत पुरवठाधारकाला कळविले. परंतु, पुरवठा धारकाने पोर्टल उपलब्ध नसल्यामुळे त्या मशीन्स मॅन्युअली सुरू करून दिल्या आहेत. त्या मशीन्सवर सर्व कर्मचाऱ्यांच्या नोंदी करण्यात आल्या असुन Excel Sheet मध्ये कर्मचाऱ्यांची उपस्थिती उपलब्ध होत असुन दरमहा ती तपासली जाते व खरेदी केलेल्या सर्व मशीन्स सध्या चालु आहेत.

(३) प्रश्नच उद्‌भवत नाही.
(४) प्रश्नच उद्‌भवत नाही.

---

**राज्यात सन २०१८ पर्यत सर्व ग्रामपंचायती डिजिटल (फायबर आप्टिक) करण्याबाबत**

**(२१) ७७६११ (१८-०४-२०१७). श्री.डि मल्लीकार्जून रेड्डी (रामटेक), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.अजित पवार (बारामती), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.राहुल मोटे (परांडा), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.संदीप नाईक (ऐरोली), श्री.योगेश (बापू) घोलप (देवळाली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०१८ पर्यत सर्व ग्रामपंचायती डिजिटल (फायबर आप्टिक) करण्यात येतील व या माध्यमातून गावे डिजिटल होऊन जलद विकास आणि सुविधा निर्माण करण्यात येणार असल्याचे माहे जानेवारी २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सर्व ग्रामपंचायती डिजिटल झाल्यामुळे शहर आणि ग्रामीण भेद दूर होणार असून खेडी स्वयंपूर्णतेसाठी स्मार्ट ग्राम योजना राबविण्यात येणार आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे काय,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (२१-१२-२०१७) :** (१) होय.

केंद्र शासनाची संस्था BBNL यांनी पहिल्या टप्प्यात राज्यातील १४४४ ग्रामपंचायती फायबर ऑप्टिक केबलने जोडण्यात आल्या आहेत. तसेच संपूर्ण नागपूर जिल्हा डिजिटल जिल्हा म्हणून घोषित करण्यात आला आहे. या शिवाय राज्यात एकूण ९९३३ ग्रामपंचायतींपर्यंत ऑप्टिक फायबर केबल टाकण्यात आलेली आहे.

(२) व (३) राज्यात सन २०१०-२०११ पासून कार्यरत पर्यावरण संतुलित समृध्द ग्राम योजनेचे रूपांतर करून राज्यातील ग्रामपंचायतींना स्वयंवृध्दीसाठी प्रोत्साहीत करण्यासाठी स्मार्ट ग्राम योजना दि.२१ नोव्हेंबर,२०१६ पासून राबविण्यात येत आहे.

स्मार्ट ग्राम योजनेत शासनाने ठरवून दिलेल्या निकषांच्या आधारे, तालुका स्तरावर तसेच जिल्हा स्तरावर सहभागी ग्रामपंचायतींना गुणांकन देवून सर्वोच्च गुण प्राप्त ग्रामपंचायतींना तालुका स्मार्ट ग्राम व जिल्हा स्मार्ट ग्राम म्हणून घोषित करण्यात येते. यामध्ये तालुका स्मार्ट ग्राम ग्रामपंचायतींना रू.१० लक्ष व जिल्हा स्मार्ट ग्राम ग्रामपंचायतींना रू.४० लक्ष रोख स्वरूपात बक्षीस वितरण करण्यात देण्यात येते. सन २०१६-१७ या वर्षात ३५१ ग्रामपंचायतींना दि.१ मे,२०१७ रोजी तालुका स्मार्ट ग्राम पारितोषिक देऊन गौरविण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**रांजणगाव-देशमुख (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) येथे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने केलेले प्राथमिक शाळेचे बांधकाम साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याबाबत**

**(२२) ७७६५६ (१९-०४-२०१७). श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रांजणगाव-देशमुख (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) येथे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने केलेले प्राथमिक शाळेचे बांधकाम साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याने कामाची गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून व्हावी अशी मागणी ग्रामपंचायतीने गट विकास अधिकारी यांना दिनांक १९ डिसेंबर, २०१६ रोजी वा त्यासुमारास पत्राद्वारे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित शाळेच्या बांधकामाची चौकशी गुणवत्ता नियंत्रण विभागाकडून करण्यात आली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार निकृष्ट दर्जाचे बांधकाम करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०१-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.

(२), (३) व (४) रांजणगाव-देशमुख (ता.कोपरगाव, जि.अहमदनगर) येथे जिल्हा परिषदेच्या बांधकाम विभागाने केलेले प्राथमिक शाळेचे बांधकाम साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्याबाबतची तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुसार, राज्य गुणवत्ता निरिक्षक बुलढाणा यांच्याकडून सदर कामाची तपासणी करण्यात आली असून, सदर तपासणीत बांधकामाचा दर्जा उत्कृष्ट असल्याचे आढळून आले आहे. त्यामुळे कार्यवाही करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

---

**पनवेल जिल्हा परिषदेच्या ५१ शाळा संगणकविना तर ७२ शाळांमधील ११५ संगणक बंद असल्याबाबत**

**(२३) ७९३८८ (१९-०४-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल जिल्हा परिषदेच्या ५१ शाळा संगणकविना तर ७२ शाळांमधील ११५ संगणक बंद असल्याचे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०१-२०१८) :**(१) होय हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) रायगड जिल्ह्यातील पनवेल तालुक्यात जिल्हा परिषदेच्या २५९ शाळा असून त्यापैकी २०६ शाळांमध्ये ३६६ संगणक उपलब्ध असून ५३ शाळेस संगणक उपलब्ध नाहीत. संगणक पुरविण्यात आलेल्या ७३ शाळेतील ११५ संगणक नादुरुस्त असल्यामुळे बंद आहेत.

सदर संगणक जुन्या प्रणालीचे (windows XP) असल्याने त्यांची दुरुस्तीचा खर्च अधिक असल्याने शाळा देखभाल अनुदानातुन संगणकाची दुरुस्ती खर्च करण्यात आला नाही. ५३ शाळांपैकी १४ शाळांना सर्व शिक्षा अभियान अंतर्गत प्रत्येकी ५ संगणक असे एकूण ७० संगणक देण्यात आले आहे. उर्वरित ३९ शाळांना स्थानिक पातळीवरील लोकवर्गणीतून संगणक प्राप्त झालेले आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**कोल्हापूर विक्रिकर विभागातील प्रशासकीय कार्यपध्दतीतील त्रुटींबाबत सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत**

**(२४) ७९४७५ (१५-०४-२०१७). डॉ.बालाजी किणीकर (अंबरनाथ) :** सन्माननीय **वित्त मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर विक्रीकर विभागात २५० कोटींच्या परताव्यात प्रशासकीय कार्यपद्धतीतील त्रुटीबाबत सेवानिवृत्त झालेल्या अधिकाऱ्यांवर भारतीय दंड संहितेमधील कलम ४६३, ४६४, ४६५, ४६८ व लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ च्या कलम १३(१)(ई) मधील तरतुदीनुसार तपासणी करून शासनाने योग्य ती कार्यवाही करावी असे अभिप्राय विधी व न्याय विभागाने दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू अभिप्रायाच्या अनुषंगाने शासनाने सदर प्रकरणातील दोषींवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार (१५-०१-२०१८) :** (१) होय.
(२) अपर विक्रीकर आयुक्त, कोल्हापूर यांच्या अहवालानुसार सेवानिवृत्त झालेले श्री. सुभाष निकम, विक्रीकर उपआयुक्त यांनी पारीत केलेल्या प्रकरणात कोणतीही महसूलहानी झाली नाही व त्यामुळे सुधारीत कार्यवाही करावी लागली नाही. बहुतांश प्रकरणात कार्यपध्दतीतील त्रुटी आढळून आलेल्या आहेत. त्यांनी बनावट दस्तऐवज तयार करुन त्याआधारे व्यापा-यांना परतावा दिल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे श्री. निकम (सेवानिवृत्त) यांच्यावर कार्यवाही करणे उचित होणार नसल्याचा निर्णय शासन स्तरावर घेण्यात आला आहे.

श्री.बाळण्णा, विक्रीकर अधिकारी यांचे निधन झाले आहे.

श्री.खोत, सहायक विक्रीकर आयुक्त यांच्यावर म.ना.से. (शिस्त व अपील) नियम १९७९ च्या - नियम १० नुसार कारवाई विक्रीकर आयुक्तांमार्फत करण्यात येत आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील नाशिक रोड वाहूली गावातील नागरिकांसाठी पंचायत समितीने बांधलेली विहिर व गोदाम विकासकाने बळकावल्याबाबत**

**(२५) ८०३८३ (१४-०४-२०१७). श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील नाशिक रोड वाहूली गावातील नागरिकांसाठी १० वर्षापूर्वी पंचायत समितीने बांधलेली विहिर व गोदाम विकासकाने बळकावल्याने त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याची मागणी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे माहे डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) हे अंशत: खरे आहे.

ग्रामस्थांनी डिसेंबर, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान अशी कोणतीही मागणी/तक्रार जिल्हा परिषद कार्यालयाकडे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून अग्रेषित करण्यात आलेली नाही. तथापि दि. २९/०२/२०१२ रोजी ग्रामस्थांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे या संदर्भात अर्ज केलेला आहे.

(२) होय.

सदर प्रकरणी चौकशी केली असता मौजे वाहुली ग्रामपंचायत कुरूंद येथे संपूर्ण ग्रामीण रोजगार योजनेतून श्री. शांताराम उंदरू ठाणगे यांच्या मालकीच्या जागेतील गोदामामध्ये एक पिण्याच्या पाणची विहीर घेण्यात आली आहे. तसेच एक बोअरवेल आहे त्यावर मोटारपंप बसवून कंपाऊडच्या शेजारी ओटा व सिंटेक्स टाकी बांधून गोदाम विकासकाने लघु नळ पाणी पुरवठा योजना तयार करून दिलेली आहे. सद्यस्थितीत वाहुली गावास या योजनेतून पाणी पुरवठा सुरू असून ग्रामस्थ पाणी वापर करत असल्याचे दिसून आले आहे. याबाबत दि. १७/११/२०१७ रोजी पंचनामा करण्यात आला आहे.

(३) सदर प्रकरणाबाबतची तक्रार पंचायत समिती कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर सदर विहीर व हातपंप ग्रामस्थांसाठी खुले करण्याविषयी लेखी सूचना सरपंच / ग्रामसेवक, ग्रामपंचायत कुरूंद यांना उपअभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उपविभाग, भिवंडी यांनी दिल्या होत्या. तथापि चौकशीअंती सदरची विहिर खाजगी जागेवर असल्याने व गोदाम विकासक सदर विहिरीतून स्वखर्चाने लघू नळ पाणी पुरवठा योजनेद्वारे ग्रामस्थांना विनामूल्य पाणी उपलब्ध करून देत असल्याने फौजदारी गुन्हा नोंदवण्याचा प्रश्न उदभवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील ग्रामपंचायतीमधील कर्मचाऱ्यांच्या मागण्यांबाबत**

**(२६) ८०४२८ (१४-०४-२०१७). श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.गणपतराव देशमुख (सांगोले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील ग्रामपंचायतीमध्ये सेवा करणाऱ्या ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या संघटनेने आपल्या मागण्यांचे निवेदन मा.मुख्यमंत्री व मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे माहे जानेवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर निवेदनानुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्या पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) व (३) ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेने त्यांच्या निवेदनामध्ये केलेल्या मागण्यांच्या अनुषंगाने अ) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनाबाबत व आकृतिबंधाबाबत शिफारशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात येत आहे.

ब) ग्रामपंचायत कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यास कर्मचाऱ्यांच्या वारसांना अनुकंपा तत्वावर नियुक्तीत प्राधान्य देणेबाबत ग्रामपंचायतींना निर्देश देणारे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

क) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांची भविष्य निर्वाह निधीची रक्कम वेतनातून कपात केली जाते. परंतु ती वैयक्तिक बँक खात्यात किंवा पोस्टात जमा न करणाऱ्या ग्रामपंचायतींवर कारवाई करण्याचे निदेश देणारे परिपत्रक निर्गमित करण्यात आले आहे. त्याची अंमलबजावणी करण्याबाबतच्या सूचना पुन्हा निर्गमित करण्यात येत आहेत.

ड) ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वेतनास प्राधान्य देणेबाबत ग्रामपंचायतींना निर्देश देणारे परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे. .

इ) राज्यातील ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांना कामगार विभागाकडून निश्चित केलेल्या दराप्रमाणे किमान वेतन देण्यात येते. कामगार विभागाकडून वेळोवेळी यामध्ये वाढ करण्यात येते व त्यानुसार सदर वाढही ग्रामपंचायत कर्मचा-यांना देण्यात येते. तसेच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांचे वेतन थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे.

ई) शासन निर्णय दिनांक ०४ मार्च, २०१४ नुसार ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या किमान वेतनाचे लोकसंख्या व उत्पन्नानुसार १००%, ७५% व ५०% शासन अनुदान देण्याचा निर्णय झाला आहे.

फ) ग्रामपंचायत स्तरावर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांबाबतच्या शासन निर्णयाची काटेकोरपणे अंमलबजावणी होत नसलेल्या ग्रामपंचायतींवर कठोर कार्यवाही करण्याबाबत दि.८ जुलै,२०१३ च्या शासन परिपत्रकान्वये यापूर्वीच सूचना दिलेल्या आहेत.

---

**रुकडी (जि.कोल्हापूर) येथील ऐतिहासिक कुस्ती मैदानाची झालेली दुरवस्था**

**(२७) ८३८६७ (२०-०४-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रुकडी (जि.कोल्हापूर) येथील ऐतिहासिक कुस्ती मैदानाची अत्यंत दुरवस्था झाल्याचे माहे फेब्रुवारी, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या मैदानातील अतिक्रमण, घाणीचे साम्राज्य हटविण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.

रूकडी, ता. हातकणंगले येथील ऐतिहासिक कुस्ती मैदानालगत गाव तलाव असून त्या पाण्याची उंची मैदानापेक्षा जास्त असल्याने सदरच्या पाण्याचा पाझर मैदानामध्ये येऊन दलदल निर्माण होत असल्याने मैदानाची दुरवस्था झाल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) (अ) मैदानातील अतिक्रमण आहे किंवा नाही याबाबत ग्रामपंचायतीने मोजणी करून घेतलेली आहे. त्याबाबतचा अंतिम मोजणी नकाशा प्राप्त झालेला नाही. तथापि ग्रामपंचायत मार्फत सदरचे भागातील अतिक्रमणाबाबत अतिक्रमण धारकांना नोटीसा लागू केल्या असून सदरची बाब न्यायप्रविष्ट आहे.
(ब) मैदान स्वच्छतेसाठी ग्रामपंचायत स्तरावरून स्वच्छता कामगार, गावातील स्वयंसेवी संस्था यांच्या सहकार्यातून वारंवार स्वच्छता करण्यात येते व त्याठिकाणी गावातील यात्रेनिमित्त व हनुमान जयंतीनिमित्त कुस्त्यांचे आयोजन दरवर्षी केले जाते.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांच्या इमारतीची झालेली दुरवस्था

**(२८) ८५०५० (११-०८-२०१७). श्री.मनोहर भोईर (उरण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कर्जत (जि.रायगड) तालुक्यातील अनेक जिल्हा परिषद शाळांच्या इमारतीची पडझड झाली असून आजूबाजूला अस्वच्छता असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर शाळांची शासनाने पाहणी केली आहे काय व पाहणीचे निष्कर्ष काय आहेत,
(३) असल्यास, त्यानुसार सदर शाळांच्या इमारतीच्या दुरुस्तीसह शाळेच्या आजूबाजूचा परिसर स्वच्छ करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०९-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.
(२) व (३) होय.

कर्जत तालुक्यातील २८० शाळांपैकी ६६ शाळांच्या १०६ वर्गखोल्या नादुरुस्त असल्याचे व शाळा परिसर अस्वच्छ असल्याचे निदर्शनास आले. शाळा परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत

मुख्याध्यापक व शाळा व्यवस्थापन समितीला सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच वर्ग खोल्या दुरुस्तीचे काम सर्व शिक्षा अभियनातंर्गत प्रस्तावित आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**लातूर जिल्ह्यात मांजरा नदीवर बांधण्यात आलेल्या उच्च पातळी बंधाऱ्यासाठी (बॅरेजेस) संपादित केलेल्या जमीनीचा मोबदला शेतकऱ्यांना मिळण्याबाबत**

**(२९) ८५७६८ (१९-०८-२०१७). श्री.अमित विलासराव देशमुख (लातूर शहर), श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (शिर्डी), श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लातूर जिल्ह्यात मांजरा नदीवर बांधण्यात आलेल्या उच्च पातळी बंधाऱ्यासाठी (बॅरेजेस) अधिग्रहण केलेल्या जमीनीचा मोबदला १२ वर्षानंतरही दिला गेला नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धनेगाव, कासारखेडा येथील बंधाऱ्यात जमीन गेलेल्या शेतकऱ्यांना मोबदला न दिला गेल्यामुळे या बंधाऱ्यात पुर्ण क्षमतेने पाणी थांबवता येत नाही, परिणामी उद्देश साध्य न होऊन परिसरात तीव्र पाणीटंचाई निर्माण होते, शेतीचे उत्पादनही वाढत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार या प्रकल्पग्रस्त शेतक-यांना मोबदला मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०१-२०१८) :** (१) लातूर जिल्ह्यात मांजरा नदीवर बांधण्यात येत असलेल्या एकूण १२ बॅरेज पैकी ३ बॅरेज कामांसाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला पूर्णपणे संबंधितांना अदा करण्यात आला असून ६ बॅरेज कामांसाठी संपादित जमिनीचा मोबदला बहुतांशी अदा केला आहे व ३ बॅरेज कामांसाठी भूसंपादन प्रस्ताव भूसंपादन अधिनियम-२०१३ नुसार कार्यवाहीत आहेत.
(२) व (३) धनेगांव, कासारखेडा उच्च पातळी बंधाऱ्याच्या एकूण जमीन संपादीत करावयाचे क्षेत्र २२४.७९ हेक्टर पैकी ११.९८ हेक्टर संपादीत जमीनीचा मावेजा अदा करण्यात आला असून उर्वरित संपादित जमीन क्षेत्र २१२.८१ हेक्टरसाठी भूसंपादनापोटी एकूण रु. ६४ कोटी इतकी रक्कम देय आहे. त्यापैकी रु. ३.१४ कोटी रक्कम संबंधीत भूसंपादन अधिकारी, निलंगा यांचेकडे दिनांक १३/६/२०१७ रोजी जमा करण्यात आली आहे. उर्वरीत रक्कम निधीच्या उपलब्धतेनुसार अदा करण्याचे नियोजन आहे.

सद्यस्थितीत बंधाऱ्यामध्ये ८.५० मी. उंची, पाणीसाठा ११.३७ दलघमी पैकी ३.०० मी. उंचीमध्ये २.१२६ दलघमी पाणीसाठा करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) धरण परिसरात गैरवर्तन करणाऱ्या पर्यटकांवर कारवाई करण्याबाबत

**(३०) ८५९२८ (१२-०८-२०१७). श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदोली (ता.शिराळा, जि.सांगली) धरण व चांदोली अभयारण्य सांगली, सातारा व कोल्हापूर जिल्ह्यातील पर्यटकांचे पर्यटन क्षेत्र आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चांदोली धरण परिसरात रस्त्यावर दारूच्या बाटल्या फोडणे, दुचाकीवरून स्टंटबाजी करणे, गोंधळ घालणे अश्याप्रकारे पर्यटक गैरवर्तन करीत असल्यामुळे फोडलेल्या बाटल्यांच्या काचांमुळे अपघात होणे व गाड्या पंक्चर होण्याचे प्रमाण वाढले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार गैरवर्तन करणाऱ्या पर्यटकांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०१-२०१८) :** (१) नाही.

(२) नाही

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## खडकपूर्णा प्रकल्पाची उंची वाढविण्याबाबत

**(३१) ८६६३३ (१२-०८-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खडकपूर्णा प्रकल्पाची उंची १ फुटाने वाढविण्याबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडकपूर्णा प्रकल्पाची उंची एक फूटाने वाढविण्याबाबतची स्थानिक लोकप्रतिनिधिनी मा.जलसंपदा मंत्री यांना पत्राद्वारे मागणी करुनही अदयापी शासनाने कोणतीच कार्यवाही केलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार खडकपूर्णा प्रकल्पाची उंची १ फूटाने वाढविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०१-२०१८) :** (१) नाही.
(२) व (३) खडकपुर्णा प्रकल्पाच्या उंची वाढीमुळे प्रकल्पाच्या खालीलबाजुस असलेल्या येलदरी प्रकल्पावर मोठया प्रमाणावर प्रतिकुल परिणाम संभवत असल्याने खडकपुर्णा प्रकल्पाची उंची वाढविणे शक्य नाही.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**मौजे सिनगांव जहॉगीर येथील रहिवाशांना खडकपूर्णा प्रकल्पातंर्गत संपादित केलेल्या त्यांच्या घरांचा मोबदला मिळण्याबाबत**

**(३२) ८६६६२ (१२-०८-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सिनगांव जहॉगीर येथील रहिवाशांचे मालकीचे राहते घर खडकपूर्णा प्रकल्पातंर्गत संपादित करुन घराचे खरेदीखत नोंदवून घेऊन त्याचा मोबदला अदयापी रहिवाशांना दिलेला नसल्याचे नुकतेच माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त रहिवाश्यांनी सन २००९ ते २०१२ पर्यत मिळालेल्या मोबदल्यावरती व्याजाची मागणी उच्च न्यायालयात केली असता उच्च न्यायालयाने दिनांक २१ डिसेंबर, २०१६ रोजी मंजूरी देऊन शासनास तीन महिन्याच्या कालावधीत रहिवाश्यांना प्रतिवर्षी १२ टक्के याप्रमाणे व्याजाची रक्कम देण्याचे आदेशित केले असतांनाही अदयापी व्याजाची रक्कम देण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, प्रकल्पबाधित रहिवाश्यांना त्यांच्या हक्काच्या मिळणाऱ्या व्याजाच्या मोबदल्यापासून वंचित ठेवण्यात आल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधिंनी कार्यकारी अभियंता, खडकपूर्णा प्रकल्प विभाग, देऊळगांव राजा यांना तसेच मा.जलसंधारण राज्यमंत्री यांना पत्रव्यवहार करुनही अद्यापी प्रकल्प बाधित रहिवाश्यांना त्यांच्या हक्काचा मोबदला देण्यात आलेला नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, सदर प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार प्रकल्प बाधितांना मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०१-२०१८) :** (१) नाही, खरेदीखतानुसार रहिवाशांना मोबदला देण्यात आलेला आहे.
(२) व (३) होय. सदर प्रकरणी मा.उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशावर विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कायदे विषयक सल्लागार यांचे अभिप्रायानुसार मा.सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे अपील (एस.एल.पी.)दाखल केल्यामुळे न्यायप्रविष्ठ प्रकरणी अंतीम न्यायनिर्णय होईपर्यंत व्याजाची रककम वाटप करता आली नाही. तथापी दि.१७/७/२०१७ रोजी मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निर्णयानुसार वाटपाची कार्यवाही सुरू आहे.

(४) होय. सदर प्रकरणी विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळाचे कायदे विषयक सल्लागार यांचे दि.३१/८/२०१७ चे अभिप्रायानुसार व्याजाची मोबदला रक्कम वाटप कार्यवाही दि.५/९/२०१७ पासुन सुरू करण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही .

---

## भुकंपग्रस्त पुनर्वसीत गावातील रस्त्याच्या सुधारणांबाबत

**(३३) ८६६९० (११-०८-२०१७). श्री.राणाजगजीतसिंह पाटील (उस्मानाबाद) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उस्मानाबाद जिल्ह्यामध्ये सन १९९३ मध्ये महाप्रलयकारी भुकंप झाला होता तेव्हा तेथील भुकंपग्रस्त गावांचे पुनर्वसन झाले होते त्यापैकी बऱ्याच गावांच्या अंतर्गत रस्त्यांची कामे सन १९९३ ते १९९५ दरम्यान झालेली होती, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरिल पुनर्वसित 'अ' व 'ब' वर्गातील गावांच्या अंतर्गत रस्त्याचे व गटाराचे काम झालेले नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार सदरिल 'अ' व 'ब' वर्गाच्या गावातील अंतर्गत रस्ते व गटाराचे काम महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१६-०१-२०१८) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) मग्रारोहयो अतंर्गत ग्रामपंचायतीच्या मागणीनुसार लोहारा तालुक्यातील मौ.राजेगाव, चिंचोली रेबे, सास्तुर, कास्ती खु, कास्ती बु, कानेगाव व हिप्परगा स. येथील अंतर्गत रस्त्यांची कामे करण्यात आली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## केळझर प्रकल्प (जि.नाशिक) आदिवासी उपयोजनेंतर्गत केळझर डावा कालव्यामध्ये पाईप लाईन टाकून भराव मजबुतीकरण करण्याबाबत

**(३४) ८७११३ (१८-०८-२०१७). श्रीमती दिपिका चव्हाण (बागलाण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) केळझर प्रकल्प (जि.नाशिक) आदिवासी उपयोजनेंतर्गत केळझर डावा कालवा सा.क्र.०-१२ कि.मी. मध्ये आर.सी.सी. पाईप लाईन टाकून भराव मजबुतीकरण करावयाच्या कामाच्या अंदाजपत्रकास सन २०१५ मध्ये वा त्या दरम्यान प्रशासकीय मान्यता देऊनही कामास सुरुवात करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीनुसार कालव्यामध्ये पाईप लाईन टाकून भराव मजबुतीकरण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) प्रस्तुत मागणीच्या अनुषंगाने तांत्रिक छाननी शासनस्तरावर चालू आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**पाटगांव (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) धरणावर बांधण्यात आलेल्या दोन विश्रांतीगृहाची झालेली दुरवस्था**

**(३५) ८७३३१ (१८-०८-२०१७). डॉ.सुजित मिणचेकर (हातकणंगले) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पाटगांव (ता.भुदरगड, जि.कोल्हापूर) धरणावर सुमारे ८-१० वर्षापूर्वी "बांधा, वापरा, आणि हस्तांतरीत करा" या तत्वावर बांधण्यात आलेल्या दोन विश्रांतीगृहाचा एकदाही वापर करण्यात आला नसल्याने सदरच्या विश्रांतीगृहांची दुरवस्था झाली असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच या धरणाच्या संरक्षणाकरिता कोणतीही उपाययोजना केली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीनुसार सदर विश्रांतीगृह दुरुस्त करण्यासह धरणाच्या संरक्षणाकरिता उपाययोजना करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०८-०१-२०१८) :** (१) नाही.
(२) नाही.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी धरणामधील गाळ काढण्याबाबत**

**(३६) ८७४७८ (१९-०८-२०१७). श्री.हसन मुश्रीफ (कागल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोल्हापूर जिल्हयातील राधानगरी धरणामध्ये एक टीएमसी (दशलक्ष घनफूट) इतका गाळ साचल्याचे महाराष्ट्र इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिटयुटने (मेरी) सन २०१४ मध्ये केलेल्या पाहणीत निदर्शनास आला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, धरणात एक टीएमसी गाळ साचल्यामुळे धरणाच्या स्वंयचलित दरवाजानाही धोका निर्माण होऊन पाणी साठवण क्षमतेवर त्याचा परिणाम झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, धरणातील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०१-२०१८) :** (१) हे खरे आहे.
(२), (३) व (४) महाराष्ट्र इंजिनिअरिंग रिसर्च इन्स्टिटयुटने (मेरी) सन २०११ मध्ये केलेल्या पाहणीनुसार राधानगरी धरणामध्ये २७.९८ दलघमी (०.९८८ टीएमसी) गाळ साचल्याचे नमूद केले आहे. या गाळापैकी ११.०७ दलघमी (०.३९ टीएमसी) इतका गाळ मृत साठयात व १६.९९ दलघमी (०.५८ टीएमसी) इतका गाळ जिवंत साठयात साचलेला आहे. तसेच जिवंत पाणी साठयात केवळ ७.६ टक्के इतकी घट दिसुन येत आहे. हि पाणी साठ्याच्या प्रमाणात अत्यल्प आहे. स्वयंचलित दरवाजावर गाळाच्या परिणामाचा प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजा भोसा ते मौजा सिंधी (रेल्वे) (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) या रस्त्याची दुरवस्था झाल्याबाबत**

**(३७) ८८५१२ (१२-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजा भोसा ते मौजा सिंधी (रेल्वे) (ता.समुद्रपूर, जि.वर्धा) या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे विद्यार्थी व नागरिकांची गैरसोय होत असल्याचे माहे मे, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याच्या दुरुस्तीबाबत स्थानिक नागरिकांनी जिल्हा प्रशासनाकडे निवेदन सादर केले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने सदर रस्त्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०१-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) प्रश्नांकित सिंधी ते भोसा हा ग्रामीण मार्ग क्र. १०६ असून या रस्त्याची लांबी २.५० कि.मी. आहे. या रस्त्याची तात्पुरती दुरुस्ती जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून जिल्हा नियोजन समितीकडून सन २०१७-१८ मध्ये या रस्त्याच्या दुरुस्तीसाठी निधी मंजूर झाला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**वर्धा (ता.हिंगणघाट) जिल्ह्यातील लोवरवणा कॅनालद्वारे येत असलेले पाणी खाजगी कंपनी बेकायदेशीरपणे वापरत असल्याबाबत**

**(३८) ८८५१८ (१८-०८-२०१७). श्री.समीर कुणावार (हिंगणघाट), श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वर्धा (ता.हिंगणघाट) जिल्ह्यातील येथील लोवरवणा कॅनालद्वारे येत असलेले पाणी खाजगी कंपनी बेकायदेशीरपणे वापरत असून याकडे दुर्लक्ष होत आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, तालुक्यातील सिंचन क्षेत्रात वाढ होऊन त्यातून शेतकऱ्यांना लाभ मिळण्यासाठी लोवरवणा कॅनालची निर्मिती केली होती,हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लोवरवणा कॅनालमधील पाणी बेकायदेशीरपणे वापरणाऱ्या खाजगी कंपन्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०१-२०१८) :** (१) नाही.

(२) लोअरवणा प्रकल्पाच्या कालव्यामुळे लाभक्षेत्रातील शेतक-यांना सिंचनाचा लाभ होत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**उजनी (जि.सोलापूर) धरणातील गाळ काढण्याबाबत**

**(३९) ८९६७९ (१२-०८-२०१७). कुमारी प्रणिती शिंदे (सोलापूर शहर मध्य) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) उजनी (जि.सोलापूर) धरणातील पाण्याची पातळी खालावली असून १२३ टीएमसी पाणी साठवण क्षमता असलेल्या या धरणात सुमारे २५ ते ३० टीएमसी इतका गाळ असल्याची शक्यता जलतज्ञांनी व्यक्त केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्यस्थितीत या जिल्हयातील ओढे, नदी, तलाव व बंधा-यातील गाळ हा लोकवर्गणीतून काढला गेला मात्र उजनी धरणातील गाळ काढण्याकडे शासनाने दुर्लक्ष केले असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उजनी धरणातील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

सन-२०११ मधील सर्व्हेक्षणानुसार उजनी जलाशयात एकूण १४.९७ टीएमसी गाळ असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) नाही.

(३) याबाबत गाळमिश्रीत वाळू/रेतीचे निष्कासन करण्यासाठी ई टेंडरिंग करणेत आले आहे. तथापि मा.उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने सदर निविदा प्रकियेस दि.२२.०८.२०१७ रोजी स्थगिती दिली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मांजरा (ता.केज, जि.बीड) प्रकल्पाच्या शीर्ष भिंतीतून होणारी पाण्याची गळती थांबविण्याबाबत**

**(४०) ८९८२३ (१२-०८-२०१७). श्री.त्र्यंबकराव भिसे (लातूर ग्रामीण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मांजरा प्रकल्प (ता.केज, जि.बीड) च्या शीर्ष भिंतीतून मोठ्या प्रमाणावर पाण्याची गळती होत असल्यामुळे व मुख्य अभियंता व मुख्य प्रशासक औरंगाबाद यांनी दिनांक २६ जानेवारी, २०१७ रोजी केलेल्या पाहणीवरून दिलेल्या सूचनेनुसार सदर गळती रोखण्यासाठी व पाण्याचा होत असलेला अपव्यय थांबविण्यासाठी सदर प्रकल्पाच्या विशेष दुरुस्तीचा प्रस्ताव, विस्तार व सुधारणा अंतर्गत कार्यकारी अभियंता, लातूर पाटबंधारे विभाग क्र.१ लातूर यांनी दिनांक १० एप्रिल, २०१७ रोजी वा त्या सुमारास अधीक्षक अभियंता व प्रशासक लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, बीड यांच्याकडे सादर केला आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रस्तावास मंजुरी देण्यासह तात्काळ आवश्यक दुरुस्तीचे काम करून गळती थांबविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०१-२०१८) :** (१) होय.
(२) विशेष दुरुस्ती कामाचे अंदाजपत्रक क्षेत्रीय स्तरावर तयार करण्यात येत असून विस्तार व सुधारणा अंतर्गत दुरुस्तीची कामे करण्याचे प्रस्तावित आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**कोठा (ता.कळंब,जि.यवतमाळ) वितरिका कालव्याचे पाणी शेतकऱ्यांच्या शेतात जावून पिकाचे होत असलेले नुकसान**

**(४१) ९११४० (१२-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोठा (ता.कळंब,जि.यवतमाळ) येथील शेतकरी श्री विलास परोपटे यांचा गट न. १५० शेती मधुन तांबा वितरीका या उपकालव्याचे बांधकाम करण्यात आले परंतु वितरीकेच्या मायनर पिचीगंचे काम करण्यात आले नसल्याने कालव्याव्दारे सोडलेले पाणी शेतकऱ्याच्या शेतात जाऊन सोयाबीन व कापुस या पिकाचे नुकसान झाले आहे,हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतीचे नुकसान होत असल्याने शेताजवळ मायनर पिचींगचे काम करण्याकरिता बेंबळा कालवे विभागाला शेतकऱ्याने पत्रव्यवहार केला असता विभागाच्या अधिकाऱ्याने दुर्लक्ष केले असल्याने शेतकऱ्याच्या पिकाचे नुकसान झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यासह शेतकऱ्याला झालेल्या नुकसानीचा मोबदला देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०१-२०१८) :** (१) व (२) हे खरे नाही.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## यवतमाळ जिल्हातील विविध पाटबंधारे प्रकल्पावर आणि बेंबंळाप्रकल्पावर पाणीवापर संस्था कार्यरत असल्याचे दर्शवून केलेला गैरकारभार

**(४२) ९१३४९ (२२-०८-२०१७). डॉ.अशोक उईके (राळेगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) यवतमाळ जिल्हातील बेंबळा प्रकल्प आणि विविध पाटबंधारे प्रकल्पावर पाणी वापर संस्था कार्यरत आहेत, किबंहुना कार्यरत असल्याचे पाटबंधारे विभागामार्फत दाखविण्यात येते तसेच काही पाणी वापर संस्था अस्तीत्वात नाहीत परंतु संबधीत विभागामार्फत कार्यरत असल्याचे दर्शविण्यात येत असल्याचे दिनांक ३० मे, २०१७ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) तसेच या कार्यरत पाणी वापर संस्थेचे विभागामार्फत ऑडीट केले नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार पाणीवापर संस्थेचे ऑडीट न करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (०९-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.

यवतमाळ जिल्ह्यात विविध प्रकल्पांवर एकूण ३१७ पाणी संस्था स्थापन झाल्या असून यापैकी १४३ संस्थांशी करारनामा झाला असून त्या कार्यरत आहेत.
(२) ज्या संस्था सहकार कायद्यांतर्गत स्थापन झाल्या आहेत त्यांचे ऑडीट सहकार विभागामार्फत झालेले आहेत. याशिवाय सन २००५ च्या महाराष्ट्र सिंचन पध्दतीचे शेतकऱ्यांकडून सिंचन व्यवस्थापन या जलसंपदा विभागाच्या कायद्यांतर्गत स्थापन सर्व पाणी वापर संस्थांचे लेखापरिक्षण मुख्य लेखा परिक्षक, जल व भूमी व्यवस्थापन संस्था (वाल्मी), औरंगाबाद यांचेमार्फत केले जाते.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

---

### संगमेश्वर व चिपळूण (जि.रत्नागिरी) तालुक्यातील नद्यांमधील गाळ काढण्याबाबत

**(४३) ९१६०७ (२१-०८-२०१७). श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) संगमेश्वर (जि.रत्नागिरी) तालुक्यातील गडनदी, शास्त्रीनदी, सोनवी नदी, काजळी नदी, असावी नदी इत्यादी नद्या गाळाने भरल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नद्यांमधील गाळ न उपसल्यामुळे पावसाळ्यात परिसरांतील गावांमध्ये तसेच बाजारपेठांमध्ये पुराचा धोका निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नद्यांची पाहणी केली आहे काय व पाहणीनुसार नद्यांमधील गाळ काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१९-०१-२०१८) :** (१) अंशत: खरे आहे.

(२) नद्यांमधील गाळामुळे अतीवृष्टीच्या वेळी काही ठिकाणी पुराचा धोका निर्माण होतो.

(३) सदर नदयांची पहाणी करुन आवश्यक तेथील अंदाजे १३ स.घ.मी गाळ काढण्याचे रू.१३.७४ लक्षचे अंदाजपत्रकास जिल्हा नियोजन समिती, रत्नागिरी यांनी प्रशासकीय मान्यता प्रदान केली असून यांत्रिकी विभागामार्फत सदर काम माहे ६/२०१७ मध्ये चालू करण्यात आले होते. सद्य:स्थितीत पावसाळयापूर्वी १.६९ स.घ.मी. गाळ उपसण्यात आला आहे. पावसाळयानंतर उर्वरित गाळ उपसण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्‍भवत नाही.

---

### मुळा (ता.नेवासा, जि.अहमदनगर) धरणातून पाण्याचा अपव्यय झाल्याबाबत

**(४४) ९२२३५ (२२-०८-२०१७). श्री.बाळासाहेब मुरकुटे (नेवासा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुळा धरणातून नेवासा (जि.अहमदनगर) तालुक्यात शेतीसाठी आवर्तन देताना मुळा पाटबंधारे विभागाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या निष्काळीपणामुळे पाण्याचा अपव्यय झाल्याने शेतक-यांवर अन्याय झाला असून संबधित अधिका-यांवर कारवाई करण्याची मागणी करणारे निवेदन स्थानिक लोकप्रतिनिधीनी मा.जलसंपदा मंत्री यांना माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनानुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१०-०१-२०१८) :** (१) होय.

(२) मा. बाळासाहेब मुरकुटे, वि.स.स. यांच्या दि.३०/०३/२०१७ चे निवेदनाचे अनुषंगाने केलेल्या चौकशीनुसार आवश्यकतेपेक्षा कमी प्रमाणात कर्मचारी वर्ग उपलब्ध असल्यामुळे सिंचन

नियंत्रणामध्ये अडचणी आलेल्या आहेत. यामध्ये अधिकारी/कर्मचारी यांचा दोष नसून पाण्याचा अपव्यय करण्यांत आलेला नाही. विषयांकित तक्रारीनुसार प्रशासकीय कामकाजाच्या दृष्टीने काही फेरबदल करण्यांत आले असून काही कर्मचा-यांच्या बदल्या करण्यात आल्या आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**राज्यातील दुष्काळग्रस्त शेतकऱ्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे विशेष पॅकेज मागणीबाबत**

**(४५) ९३०२८ (१५-०८-२०१७). श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील दुष्काळाने ग्रासलेल्या १४ जिल्हांसाठी शासनाने केंद्र शासनाकडे १० हजार ६८४ कोटी रुपयांच्या विशेष पॅकेजची मागणी केली असल्याचे माहे एप्रिल, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या पॅकेजमध्ये प्रामुख्याने मराठवाडा आणि विदर्भातील अपूर्ण सिंचन प्रकल्प पूर्ण करण्यासाठी लागणाऱ्या दीर्घकालीन निधीचा समावेश आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, या मागणीचा केंद्र शासनाकडे पाठपुरावा करण्याकरिता शासनाने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१५-०१-२०१८) :** (१) होय. विदर्भ व मराठवाड्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील आणि उर्वरित महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण जिल्ह्यातील प्रकल्प / प्रकल्प घटक पूर्ण करण्याकरिता निधी उपलब्ध करुन देण्यासाठी राज्य शासनाकडून केंद्र शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात आला आहे.
(२) होय. सदर प्रस्तावात विदर्भ व मराठवाड्यातील १४ आत्महत्याग्रस्त जिल्ह्यातील १०४ प्रकल्पांचा समावेश आहे. तसेच उर्वरित महाराष्ट्रातील अवर्षणप्रवण जिल्ह्यातील ७ प्रकल्पांचा समावेश आहे.
(३) याबाबत केंद्र शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे. मा.मुख्यमंत्री महोदयांनी मा.पंतप्रधानांना, मा.सुश्री. उमा भारती, तत्कालीन केंद्रीय जलसंसाधन मंत्री व मा.श्री.अरुण जेटली, केंद्रीय वित्त मंत्री यांना निधी मिळणेसाठी पत्राद्वारे विनंती केली आहे. तसेच मा.मुख्यमंत्री व मा.जलसंपदा मंत्री यांनी मा.पंतप्रधान, मा.श्री.नितीन गडकरी, केंद्रीय जलसंसाधन मंत्री व मा.श्री.अरुण जेटली, केंद्रीय वित्त मंत्री यांची नवी दिल्ली येथे प्रत्यक्ष भेट घेऊन सदर पॅकेज मंजुरीसाठी विनंती केली आहे. श्री.अरुण जेटली, केंद्रीय वित्त मंत्री तसेच मा.पंतप्रधान यांचे प्रधान सचिव यांचे समवेत दि.१४/११/२०१७ रोजी नवी दिल्ली येथे झालेल्या बैठकीत त्यांनी सदर मागणीस तत्वत: मान्यता दिली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**मौजे इसरुळ (जि.बुलढाणा) गावातील ग्रामपंचायतीच्या गैरकारभाराबाबत**

**(४६) ९३२९५ (२२-०८-२०१७). डॉ.शशिकांत खेडेकर (सिंदखेड राजा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे इसरुळ (जि.बुलढाणा) गावातील पाणी टंचाईसाठी पाच लाख ८० हजारांची योजना आणली परंतु ग्रामपंचायतीच्या गैरकारभारामुळे बनावट पाईपलाईन टाकल्याने गावात पाणी पोहचत नसल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावातील पाण्याची टाकी कोरडया अवस्थेत उभ्या असून लाखो रुपये खर्च करुन गावात पाणी पोहचत नसल्याने ग्रामस्थांना पाण्यासाठी वणवण करावी लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास,याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार गैरकारभार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. अशा आशयाचे निवेदन दिनांक ०८ जून, २०१७ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, चिखली यांचेकडे प्राप्त झाले होते.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) चौकशी करण्यात आली आहे.मौ.इसरुळ येथे खडकपूर्णा प्रकल्पांतर्गत सन २००७ मध्ये पूर्ण केलेल्या कायमस्वरुपी नळ योजनेची मेन पाईपलाईन ही धरणाच्या बुडीत क्षेत्रातील पाण्याखालून होती. ती खराब झाल्याने त्याचा मार्ग बदलून नवीन पाईपलाईनचे काम हे सन २०१५-१६ पाणी टंचाई कार्यक्रमांतर्गत पूर्ण करण्यात आले आहे. त्यामध्ये बसविण्यात आलेले पाईप हे ISI मार्क असलेले चांगल्या गुणवत्तेचे व त्रयस्थ तपासणी झालेले पाईप आहेत. दिनांक ०७/०६/२०१७ ते दिनांक ०९/०६/२०१७ या कालावधीत योजनेचा पाणबुडी पंप नादुरुस्त झाल्याने गावाचा पाणीपुरवठा खंडीत झाला होता. मात्र त्याची तात्काळ दुरुस्ती करुन पाणी पुरवठा पूर्ववत सुरु करण्यात आला असून आज रोजी पाणी पुरवठयाबाबत कोणतीही तक्रार नाही. त्यामुळे प्रकरणी कोणताही गैरकारभार झालेला नसल्याने कारवाईची आवश्यकता नाही.

(४) लागू नाही.

---

**मौजे कासारबेहळ ते करंजखेड महागांव (ता.महागांव, जि.यवतमाळ) रस्त्यांचे डांबरीकरणाचे काम गेल्या दोन वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(४७) ९३७९९ (१९-०८-२०१७). श्री.राजेंद्र नजरधने (उमरखेड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कासारबेहळ ते करंजखेड महागांव (ता.महागांव, जि.यवतमाळ) या रस्त्याचे डांबरीकरणाचे काम गत दोन वर्षापासून अपूर्णावस्थेत असल्याचे माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर रस्त्याची काम प्रलंबित असल्याचे कारणे काय आहेत,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करून सदर रस्त्याचे काम तात्काळ पूर्ण करण्यासह संबंधित कंत्राटदारावंर कारवाई करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (११-०१-२०१८) :** (१) व (२) होय, हे खरे आहे. सदर काम मार्च २०१६ पर्यत ९० टक्के पूर्ण झाले असून उर्वरीत काम कंत्राटदाराने पूर्ण केले नाही.
(३) मौजे करंजखेड ते कासारबेहळ इतर जिल्हा मार्ग क्र. १८४ मधील २/०० ते ३/८०० कि.मी. लांबीमधील डांबरी पृष्ठभागाचे नुतनीकरण करण्याचे रु.२५.०० लक्षचे काम १३ वा वित्त आयोग राज्यस्तर मधून मंजूर असून काम दिनांक २९.४.२०१६ पर्यत पूर्ण करावयाचे होते. परंतु सदर काम मार्च २०१६ पर्यत ९० टक्के पूर्ण करण्यात आले असून त्यानंतर कंत्राटदाराने काम बंद ठेवल्याने त्यास जिल्हा परिषदेमार्फत काळ्या यादीत टाकण्याची कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच या रस्त्याचे अपूर्ण राहिलेले काम मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेत समाविष्ट करण्यात आले आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

### जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील मजुरांना काम उपलब्ध करून देण्याबाबत

**(४८) ९३८११ (१९-०८-२०१७). श्री.विजय भांबळे (जिंतूर) :** सन्माननीय **रोजगार हमी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मजुराच्या हाताला काम उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शासनाची असून जिंतूर (जि.परभणी) तालुक्यातील मजुरांना तहसील, कृषी, पंचायत समिती, लघु सिंचन विभागातंर्गत चालू वर्षासाठी सिंचन विहिरीशिवाय कोणतीही कामे मंजूर करण्यात आलेली नाहीत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार मजुरांना काम उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. जयकुमार रावल (१६-०१-२०१८) :** (१) हे खरे नाही.
(२) पंचायत समिती, जिंतूर अंतर्गत विहीर पुर्नभरण १९० कामे व शोष खड्डे ७६ कामे अशा एकूण २६६ कामांना मंजूरी प्रदान करण्यात आली असून त्यापैकी जलयुक्त शिवार अंतर्गत विहीर पुर्नभरणाची ७४ कामे पुर्ण करण्यात आली आहेत. घरकुल बांधकामाचे ५२ व एकूण १२६ ई मस्टरचे पेमेंट पारीत करण्यात आले असून त्यांचे एकूण २८२४ एवढे मनुष्य दिवस उपलब्ध

झालेले आहेत. कृषी विभागाच्या ११२ व्हर्मी कंपोस्टींग, १४७ नॅडेप प्रस्तावांना तसेच वन विभागाच्या ११ व सामाजिक वनीकरण विभागाच्या २ अशा एकूण १३ रोपवाटीकांना व ४ वृक्ष लागवडीच्या कामांना मान्यता देण्यात आलेली आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

**बिरवाडी (ता.महाड, जि.रायगड) ग्रामपंचायतीमध्ये नियमबाहय पध्दतीने करण्यात आलेल्या कामकाजाबाबत**

**(४९) ९३८७८ (१९-०८-२०१७). श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) बिरवाडी (ता.महाड, जि.रायगड) ग्रामपंचायतीमध्ये नियमबाहय पध्दतीने करण्यात आलेल्या कामकाजाची चौकशी करण्याचे आदेश मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायत विभागाच्या उपमुख्य कार्यकारी अधिका-यांना नुकतेच माहे जून, २०१७ मध्ये वा त्या दरम्यान दिले आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त आदेशानुसार शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीनुसार उक्त कामकाजाच्या चौकशीचा अहवाल शासनास सादर केला आहे काय,
(३) असल्यास, चौकशी अहवालानुसार दोषींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे (०८-०१-२०१८) :** (१) होय. हे खरे आहे.
(२) होय. हे खरे आहे.
(३) गट विकास अधिकारी, महाड यांनी सदर प्रकरणी केलेल्या चौकशीच्या अनुषंगाने, ग्रामपंचायतीने विहीत कार्यपद्धतीचा अवलंब न करता भरती केलेल्या व सेवेत कायम केलेल्या मागासवर्गीय कर्मचाऱ्यांना ग्रामपंचायतीने सेवेतून काढून टाकले आहे.

प्रश्नांकित विषयाबाबत श्री.गुलाम माटवणकर व इतर ग्रामस्थ, बिरवाडी यांनी दि.०२.०६.२०१७ रोजी तक्रार अर्ज दिला होता. तक्रारदाराच्या उपरोक्त मुद्द्याव्यतिरिक्त इतर मुद्द्यांबाबत काही अनियमितता आढळून आली नाही तक्रारदाराने दि.२३.१०.२०१७ च्या पत्रान्वये तक्रार अर्ज मागे घेतला आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

**राज्यातील मोठ्या धरणातुन गाळ मिश्रीत रेती काढण्याबाबत**

**(५०) ९४११३ (२१-०८-२०१७). श्री.एकनाथराव खडसे (मुक्ताईनगर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील मोठ्या धरणातुन गाळ मिश्रीत रेती काढण्याबाबतचे विचाराधीन सुधारीत धोरण निश्चित झाले आहे काय,
(२) असल्यास, सुधारीत धोरणानुसार मोठ्या धरणातुन गाळ मिश्रीत रेती काढण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन (१६-०१-२०१८) :** (१) राज्यातील मोठया पाटबंधारे प्रकल्पातून गाळ व गाळमिश्रीत वाळू/रेती निष्कासनाबाबत धोरण दि. ०४ मे, २०१७ च्या शासन निर्णयान्वये निश्चित केले आहे.
(२) व (३) सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणी बाबत मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ येथे जनहित याचिका क्र. ७८/१७ तसेच रिट पिटीशन क्र. १०३११ /१७ दाखल होऊन सदर शासननिर्णयास व त्यास अनुसरुन करण्यात येत असलेल्या प्रक्रियेस मा.न्यायालयाने स्थगिती दिलेली आहे. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने पुढील योग्य ती कार्यवाही करण्याची तजवीज ठेवली आहे.

---

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा.**

---

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.